Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १५१ • Title - Code :- MAHMAR49513 • शनिवार दि.२ मार्च २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# कायदा सुव्यवस्था राखण्यास सरकार अपयशी-अंबादास दानवे

## नोटीफिकेशन मधून मराठा समाजाची फसवणूक केल्याचा आरोप

**मुंबई-राज्यात मोठया प्रमाणात भ्रष्टाचार माजला असून मुंबई, नवी मुंबईत कायदा व सुव्यवस्थेचे धिंदोडे निघाले असून कायदा सुव्यवस्था राखण्यात या सरकारला अपयश आलं असल्याची टीका विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली. मुंबई, नवी मुंबईत दलालांचा सुळसुळाट असून हप्तेबाजीखोरांच जाळ पसरले आहे. शेतकरी, बेरोजगार तरुणांना न्याय देण्यास हे सरकार असक्षम ठरलं आहे. नवीन कायद्याबाबत माथाडी कामगार त्रस्त असून आशा सेविका मोबदल्यासाठी टाहो फोडत आहेत.गिरणी कामगार घरासाठी आंदोलन करत असताना त्याकडे या सरकारच लक्ष जात नाही. बेकायदेशीर काम व धनदांडगे व्यावसायिक यांच्या मागे हे सरकार उभं असून सर्वसामान्य जनतेला वाऱ्यावर सोडले ,अशा कठोर शब्दांत दानवे यांनी सरकारला सुनावत सरकारच्या या भूमिकेचा २६० अनव्ये प्रस्तावावर बोलताना विरोध नोंदवला.**



सीसीआय केंद्र, कापूस खरेदी केंद्र बंद असल्याने शेतकऱ्यांना नाइलाजस्तव व्यापाऱ्यांना कापूस द्यावा लागतो.आयात निर्यात धोरणामुळे शेतकऱ्यांची परिस्थिती कठीण झाली आहे. मुंबईत ४० रुपये दराने विकला जाणारा कांदा नाशिक, संभाजी नगर जिल्ह्यात ३ रुपये दराने विकला जातो. इतकी तफावत का असा प्रश्न विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सरकारला विचारला. सरकार कोट्यवधी रुपयांचे आकडे जाहीर करते मात्र शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे पोहचत नाही. दुष्काळग्रस्त भागात जनतेला सवलती पोहचत नाहीत. कापसाचा आयात निर्यातीचा धोरण शेतकरी विरोधी आहे. कांदा कापूस निर्यात करणे आवश्यक असताना शेतकऱ्यांचे अंगठे मोडण्याचा काम सरकार करतंय, असा आरोप दानवे यांनी केला. दावोसमध्ये मोठया रोजगाराच्या घोषणा केल्या गेल्या मात्र बेरोजगारीची स्थिती जैसे थे आहे. सारथी बार्टी महाज्योतीच्या परीक्षेचे २ वेळा पेपर फुटल्याने विद्यार्थ्यांना परीक्षा देता आली नाही सरकार याची दखल घेणार की नाही असा सवाल देखील दानवे यांनी उपस्थित केला.नोटीफिकेशन मधून सरकारने मराठा समाजाची मोठी फसवणूक केल्याचा गंभीर आरोप दानवे यांनी केला. तसेच मराठा समाजाची लोकसंख्या ३० वरून २८ टक्के कशी झाली असा सवाल देखील त्यांनी उपस्थित केला. मुख्यमंत्री व दुसरे मंत्री वेगवेगळी भूमिका मांडतात, एकप्रकारे सरकार मराठा समाजाची दिशाभूल करण्याचं काम करत असल्याचा आरोप दानवे यांनी केला. नवी मुंबईचे परिमंडळ २ चे उपायुक्त विवेक पानसरे व पंकज ढहाणे हे मुख्यमंत्री यांच्या पक्षात येण्यासाठी दुसऱ्यांच्या फोनवरून धमक्या देत असल्याची माहिती दानवे यांनी सभागृहात दिली. ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे, भक्ती कुंभार यांच्यावर झालेल्या हल्ल्या प्रकरणी ही दानवे यांनी ताशेरे ओढले. तलाठी भरती घोटाळा, संभाजी नगर जिल्ह्यात निर्वासितांची २५० एकर मालमत्ता दिवसांत एका व्यक्तीच्या नावे केल्याप्रकरणीचा महसूल विभागातील घोटाळा ही दानवे यांनी सभागृहाच्या निर्दशनास आणला.

### सरकारच्या फक्त घोषणा आणि शेतकऱ्यांच्या पदरी निराशा

राज्यात मंगळवारी रात्री १४ जिल्ह्यात मोठया प्रमाणात गारपीट झाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. मात्र २४ तास होत असतानाही सरकारने साधे पंचनामे करण्याचे आदेश दिले नाही. जवळपास ४६ हेक्टर जमिनीच नुकसान झालं आहे. सरकार नुसत्या घोषणा आणि घोषणा शिवाय काही करत नाही यामुळे शेतकऱ्यांच्या पदरी निराशा पडली आहे. शेतकऱ्यांची ज्या पद्धतीने अडवणूक पिळवणूक होत आहे ते पाहता दगडाला पाझर फुटेल अशी स्थिती आहे. स्वामिनाथन आयोगाने सुचवलेल्या कोणत्याही सूचनांचे पालन केले जात नाही. कापूस, सोयाबीन, धान, केळी व संत्रा पिकांचे नुकसान होत असताना सरकार शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचे न्याय देऊ शकत नाही. कापसाला १ हजारा पेक्षा जास्त भाव मिळत नाही. हमीभावापेक्षा कमी भाव दिला तर गुन्हे दाखल करू या सरकारने केलेल्या वाक्याचा त्यांना विसर पडला असल्याची टीका अंबादास दानवे यांनी केली.

# धावत्या एसटी बसने घेतला पेट

## घोटच्या जंगलात आगीचा थरार;प्रवासी थोडक्यात बचावले

**मुलचेरा । प्रतिनिधी**

गडचिरोली जिल्ह्यात अगोदरच एसटी महामंडळाच्या भंगार बस सेवेमुळे नागरिक त्रस्त झाले असताना आणखी एक घटना समोर आली आहे.मुलचेरा ते घोट रस्त्यावर जंगलात धावत्या एसटी बसने अचानक पेट घेतल्याने प्रवाश्यांची भर जंगलात मोठी तारांबळ उडाली.यातून सर्व प्रवासी सुखरूप बाहेर पडले असलेतरी या घटनेमुळे भयभीत झाले आहे.



प्राप्त माहितीनुसार गडचिरोली आगाराची बस मुलचेरा तालुका मुख्यालयात दररोज मुक्कामाणे असते ती बस दररोज पहाटे ६ वाजता मुलचेरा वरून घोट-चामोर्शी मार्गे गडचिरोलीला जाते.शुक्रवार (१ मार्च) रोजी एम एच-०७ सी-९३१६ क्रमांकाची एसटी बस नेहमीप्रमाणे पहाटे ६ वाजता प्रवाश्यांना घेऊन गडचिरोलीकडे निघाली होती. घोटच्या जंगलात अचानक बसने पेट घेतल्याने या बस मध्ये असलेले प्रवासी स्वतःचा जीव वाचविण्यासाठी तातळीने बसमधून खाली उतरले. जवळपास ७ ते ८ प्रवासी आणि चालक-वाहक असल्याची माहिती समोर येत असून सर्वजण सुखरूप आहेत.घोटच्या जंगलात धावत्या एसटी बस मधून अचानक धूर निघत असल्याने प्रसंगावधान साधून चालक व वाहकाने प्रवेश्यांना खाली उतवरले आणि स्वतःही आपला सामानसुमान घेऊन खाली उतरले.त्यानंतर लगेच बसने पेट घेतला. या बस मधील प्रवासी घाबरलेल्या अवस्थेत जंगलाच्या दिशेने जाऊन दूर उभे झाले.तर चालक आणि वाहकाने झाडांच्या फांद्या हातात घेऊन आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला.विशेष म्हणजे गडचिरोली जिल्ह्यातील गडचिरोली आणि अहेरी या दोन आगारात नवीन बसेस नसल्याने जुन्याच बसेसवर दारमदार असल्याने बस मध्ये तांत्रिक बिघाड होणे,भर रस्त्यावर बस बंद पडणे,आग लागणे अश्या घटना हे नित्याचेच झाले आहे.शुक्रवारी सकाळच्या सुमारास तर बसने पेट घेतल्याने प्रवासी चांगलेच भयभीत होऊन धाव घेतली. सुदैवाने जीवितहानी टळली असली तरी नागरिकांना याचा चांगलाच फटका बसला आहे. याबाबत अधिक माहिती घेण्यासाठी गडचिरोलीच्या आगार व्यवस्थापक राखडे यांना विचारले असता बसमध्ये असलेल्या बॅटरीचा स्पोट होऊन बॅटरी जळाले होते. सर्व प्रवासी सुखरूप असल्याची माहिती त्यांनी दिली आहे.

### शासकीय कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची बातमी

# सुधारित राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना लागू मुख्यमंत्री शिंदे यांची विधिमंडळात घोषणा

**मुंबई**-राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीतील (एनपीएस) बाजारामधील चढ-उतारामुळे निर्माण होणारी गुंतवणूक विषयी जोखीम राज्य शासन स्वीकारेल असे जाहीर करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील १ नोव्हेंबर २००५ रोजी व त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचारी-अधिकाऱ्यांसाठी सुधारीत राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना लागू करण्याचा निर्णय आज विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात जाहीर केला. या निर्णयानुसार कर्मचाऱ्यांनी विकल्प दिल्यास त्यांना शेवटच्या वेतनाच्या ५० टक्के इतके निवृत्तिवेतन व त्यावरील महागाई भत्ता वाढ, तसेच निवृत्तिवेतनाच्या ६० टक्के इतके कुटूंब निवृत्तिवेतन व त्यावरील महागाई भत्ता वाढ मिळणार आहे.

'हा निर्णय लाखो कर्मचारी-अधिकाऱ्यांच्या उज्ज्वल भविष्याच्या दृष्टीनं महत्वाचा आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या दृष्टीनंही हितकारक ठरेल,असा विश्वास मुख्यमंत्री यांनी यावेळी व्यक्त केला. तसेच कर्मचारी संघटनांना दिलेला शब्द पाळल्याचेही नमूद केले. राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना सुधारीत करण्यासाठी नेमलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालावर अभ्यास केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.मुख्यमंत्री निवेदनात म्हणाले की, दिलेल्या आश्वासनानुसार राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजना सुधारीत करण्यासाठी नेमलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींवर वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव व सेवा विभागाचे अपर मुख्य सचिव यांनी संघटनेसोबत चर्चा करुन सुधारीत राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेची तत्वे निश्चित केली आहेत. त्यास अधिकारी, कर्मचारी संघटनेनेही सहमती दर्शवली आहे समितीचे निष्कर्ष व शिफारशी विचारात घेऊन राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीतील बाजारामधील चढ-उतार यामध्ये निर्माण होणारी गुंतवणूक विषयी जोखीम राज्य शासनाने स्विकारावी हे शिफारशीतले तत्व मान्य करुन राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणालीतील नियत वयोमानानुसार निवृत्त होणारे कर्मचारी यांनी जर प्रस्तावित सुधारीत राष्ट्रीय निवृत्तिवेतन योजनेचा विकल्प दिल्यास त्यांना त्यांच्या शेवटच्या वेतनाच्या ५०% इतके निवृत्तिवेतन व त्यावरील महागाई वाढ तसेच निवृत्तिवेतनाच्या ६०% इतके कुटुंब निवृत्तिवेतन व त्यावरील महागाई वाढ मिळेल याबाबतीत राज्य शासनातर्फे यथोचित कार्यवाही करण्यात येईल.'मुख्यमंत्री म्हणाले की, वयोमानानुसार निवृत्ती स्वीकारावी लागते. त्यामुळं निवृत्तीवेतन हाच अनेकांसाठी जगण्याचा आधार ठरतो. म्हणूनच सुरवातीपासूनच आम्ही या विषयावर सुरवातीपासून संवेदनशील राहीलो आहोत. निवृत्तीनंतर शासकीय कर्मचाऱ्यांना सुरक्षित व सन्मानपूर्वक आयुष्य जगता यावं हे तत्व मान्य केलंय. याविषयावर आम्ही राज्य सरकारी कर्मचारी-अधिकाऱ्यांच्या विविध संघटनांशी वारंवार संवाद-संपर्कात होतो. ज्या-ज्यावेळी या संघटनांनी या विषयावर चर्चेची, बोलण्याची मागणी केली. त्या-त्यावेळी आम्ही त्यांना वेळ दिला. समितीच्या अहवालावरही बैठका घेण्यात आल्या. मंत्रिमंडळातील सहकारी, कर्मचारी-अधिकाऱ्यांच्या प्रतिनिधीशी, तज्ज्ञांशीही चर्चा केली आहे. यात उपमुख्यमंत्री तथा तत्कालिन वित्त मंत्री देवेंद्र फडणवीस तसेच विद्यमान वित्तमंत्री अजित पवार यांनीही सकारात्मक सूचना केल्याचेही मुख्यमंत्र्यानी नमूद केले.

# ताडोबा महोत्सवाचे भव्य उद्घाटन:सुरु झाला संवर्धन आणि संस्कृतीचा उत्सव

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वन्यजीव संरक्षण आणि शाश्वत विकासावर भर देणाऱ्या महोत्सवाला आपला पाठिंबा दिला आहे

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सगळ्यांना उत्सुकता असलेला ताडोबा महोत्सव आज महाराष्ट्रातील चंद्रपूरमध्ये मोठ्या उत्साहात आणि जोमात सुरू झाला. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाद्वारे आयोजित केलेल्या तीन दिवसीय जलाशयाच्या उद्घाटनाच्या दिवशी, मनमोहक कामगिरी आणि मान्यवरांच्या भाषणांची मालिका उलगडली, श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले आणि अविस्मरणीय अनुभवासाठी मंच तयार केला.या सत्राची सुरुवात तांत्रिक सत्रे आणि वन्यजीव संरक्षण आणि शाश्वत पर्यटन पद्धतींच्या विविध पैलूंवर लक्ष केंद्रित करणाऱ्या प्रदर्शनांनी झाली. सहभागींनी ज्ञानवर्धक चर्चेत गुंतले आणि प्रकृती संबंधी प्रश्नमंजुषाद्वारे त्यांच्या ज्ञानाची चाचणी घेतली, यामुळे दिवसाच्या कार्यक्रमांची छान शृंखला बांधली गेली.

उद्घाटन समारंभाची सुरुवात पारंपारिक गोंडी परंपरेने झाली, या प्रदेशातील समृद्ध सांस्कृतिक वारस्याचे दर्शन घडले, त्यानंतर दीपप्रज्वलन समारंभ आणि मान्यवर आणि मंत्र्यांची भाषणे झाली. सुप्रसिद्ध अभिनेत्री आणि महाराष्ट्राच्या वन्यजीव सद्भावना दूत रवीना टंडन ज्या या कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या.यांनी आपला नैसर्गिक वारसा जतन करण्याचे महत्त्व सांगून प्रेरणादायी भाषण केले. सायंकाळचे वैशिष्ट्य म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेला हार्दिक संदेश, ज्यात वन्यजीव संरक्षण आणि शाश्वत विकासाच्या महत्त्वावर जोर देण्यात आला. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या चित्तथरारक सौंदर्याचे दर्शन घडवणाऱ्या आकर्षक लघुपटाचे सादरीकरणही प्रेक्षकांना करण्यात आले. यानंतर महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडवणारे पारंपारिक नृत्य सादर करण्यात आले.ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे (टीएटीआर) क्षेत्र संचालक डॉ. जितेंद्र रामगावकर यांनी प्रास्ताविक केले त्यानंतर सर्व मान्यवर पाहुण्यांचे स्वागत प्रेमळ आणि आदरातिथ्याने करण्यात आले. या दिवशी वन्यजीव संवर्धनाशी संबंधित महत्त्वपूर्ण प्रकाशनांचे प्रकाशन आणि महाराष्ट्राचा नैसर्गिक वारसा जतन करण्याच्या उद्देशाने उपक्रमांचे अनावरण देखील




झाले. मान्यवरांच्या संबोधनाने या प्रदेशातील मौल्यवान परिसंस्थांचे रक्षण करण्याच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला.सुप्रसिद्ध कलाकार सुदर्शन पटनायक यांच्या सँड आर्ट शो सह मंत्रमुग्ध करणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमाने उत्सवाचा समारोप झाला, त्यानंतर ख्यातनाम गायिका श्रीमती यांच्या मनाला भिडणारी संगीत मैफल. श्रेया घोषाल आपल्या सुरेल आवाजाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करत आहे. ताडोबा महोत्सव पुढील दोन दिवसांत वन्यजीव संरक्षण, शाश्वत पर्यटन आणि स्थानिक वारसा साजरा करत राहण्याचे वचन देतो, ज्यामुळे उपस्थितांना एक समृद्ध आणि अविस्मरणीय अनुभव मिळेल.ताडोबा महोत्सवाची निर्मिती ई-फॅक्टर मॅनेजमेंट द्वारे करण्यात आली आहे. महोत्सवाचे आयोजन करण्यात भारतातील सर्वांत प्रसिद्ध म्हणून है फेक्टर ओळखली जाते.

### ताडोबा उत्सव हा केवळ उत्सव नाही

ही आमची नैसर्गिक वारसा आणि शाश्वत विकासाची बांधिलकी आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून, आम्ही आमच्या वन्यजीवांचे रक्षण करण्यासाठी आणि मानव आणि निसर्ग यांच्यातील एकोपा वाढवण्याच्या आमच्या समर्पणाची पुष्टी करतो. असे प्रतिपादन ना.सुधीर मुनगंटीवार, महाराष्ट्र सरकारचे वने, सांस्कृतिक कार्य आणि मत्स्यव्यवसाय मंत्री यांनी केले.

# स्व.भाई गणपतराव देशमुख हे आदर्श राजकारणातील ध्रुवतारा व राजऋषी होते - प्रा.डॉ.श्रीकांत कोकरे

## उदनवाडीत रंगला 'राजकीय मानदंड : भाई गणपतराव देशमुख 'या चरित्र ग्रंथावरील परिसंवाद

**उदनवाडी । वार्ताहर**

स्वर्गीय आमदार भाई गणपतराव देशमुख हे आदर्श राजकारणातील ध्रुवतारा व राजऋषी होते.त्यांची निष्ठा,सचोटी व उच्च नैतिकता ही विश्वविक्रमी होती. त्यांच्या जीवनावरील प्रा.डॉ.किसन माने यांनी लिहिलेला ' राजकीय मानदंड : भाई गणपतराव देशमुख ' हा चरित्रग्रंथ खूपच अभ्यासपूर्ण व नव्या पिढीला दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरणारा आहे. मुखपृष्ठापासून - मलपृष्ठापर्यंत हा ग्रंथ सर्वांग सुंदर साकारला आहे. प्रकरणांची शीर्षके फारच सुंदर असून,भाषाशैलीही मनमोहक आहे. आबासाहेबांच्या विधानसभेतील भाषणांचा, प्रचारसभांतील अनेक भाषणांचा संग्रह पुस्तक रूपाने येणे काळाची गरज आहे. असे विचार सुप्रसिद्ध साहित्यिक व शास्त्रज्ञ प्रा. डॉ. श्रीकांत कोकरे (जत )यांनी व्यक्त केले.उदनवाडी येथील महात्मा फुले सार्वजनिक वाचनालयाने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त दिनांक २५ फेब्रुवारी, २०२४ रोजी प्रा.डॉ.किसन माने लिखित 'राजकीय मानदंड : भाई गणपतराव देशमुख 'या चरित्र ग्रंथावर आयोजित परिसंवादात प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. श्रीकांत कोकरे बोलत होते. यावेळी परिसंवादात प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. वामन जाधव (पंढरपूर ), प्रा. मुकुंद वलेकर, कवी शिवाजी बंडगर हे सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाचनालयाचे अध्यक्ष माजी प्राचार्य विठ्ठल वलेकर हे होते.

प्रा.डॉ. श्रीकांत कोकरे पुढे म्हणाले की, स्वर्गीय आबासाहेबांची भाषणे व आठवणी ऑडिओ बुक रूपानेही यायला हव्यात. जनमनातील आबासाहेबांच्या मोठ्या प्रमाणातील आठवणी पुस्तक रूपाने येण्यासाठी प्रयत्न करायला हवा.प्रा. डॉ. वामन जाधव म्हणाले, नव्या पिढीत सोलापूर जिल्ह्यामध्ये ताकदीचा चरित्रकार म्हणून प्रा.डॉ.किसन माने यांच्याकडे पाहावे लागते. इतिहास, तत्त्वज्ञान व राजकारणाचा अभ्यास करताना डॉ.माने लिखित चरित्र ग्रंथाकडे पाहावे लागते. सत्ता ही सेवेसाठी व समाज परिवर्तनासाठी असते.सत्ता भोगासाठी नसते, हे आबासाहेबांनी आपल्या आदर्श वर्तनाने दाखवून दिले. आज राजकारणात नैतिकतेचा अंधार दाटत असताना डॉ. किसन माने यांनी स्वर्गीय आमदार गणपतराव देशमुख यांच्या चरित्राने प्रकाशाची पणती लोकांच्या पुढे ठेवली आहे. जातिभेदाच्या पलीकडे जाऊन काम करणाऱ्या आबासाहेबांचे चरित्र नव्या पिढीला दिशादर्शक व मार्गदर्शक नक्कीच आहे. आबासाहेबांची उच्च नैतिकता आज दुर्मिळ झाली आहे. आज गावोगावी आबासाहेबांच्या चरित्रग्रंथाची




पारायणे व्हायला हवीत.कवी शिवाजी बंडगर म्हणाले, अनेक विषयांतून आबासाहेबांचे व्यक्तिमत्व नव्याने साकारता येईल. आबासाहेबांवर नवे संशोधन व्हावे, ही प्रेरणा या चरित्रग्रंथातून मिळते. आबासाहेबांचे आचार आणि विचार तळागाळात पोहोचविण्याचे काम डॉ.किसन माने यांनी छान केले आहे.प्रा. मुकुंद वलेकर म्हणाले, शेतकरी कामगार पक्षाचे नेते म्हणून आयुष्य वेचलेल्या दाजिबा देसाई, कृष्णराव धुळप, प्रा. एन.डी. पाटील, एस.एम.पाटील, आ. जयंत पाटील यांचे जीवनकार्य पुस्तक रूपाने येणे आज नव्या पिढीसाठी नितांत गरजेचे आहे. त्याशिवाय नव्या पिढीला त्यांचे जगणे - भोगणे कळणार नाही. स्वर्गीय गणपतराव देशमुख यांच्या संस्मरणीय आठवणी सांगोला तालुक्यासह महाराष्ट्रातील जुन्या - जाणत्या माणसांकडून लिखित व ऑडिओ-व्हिडिओ रूपात संकलित करण्याची गरज आहे.आठवणींतून आबासाहेबांचे मोठेपण नव्या पिढीपुढे अमूल्य ठेवा म्हणून ठेवता येईल.आबासाहेबांचे प्रेरणादायी चरित्र देशभर व जगभर पोहोचविण्यासाठी डॉ. किसन माने यांनी लिहिलेल्या मौलिक चरित्रग्रंथाची जगातील अनेक भाषांमध्ये भाषांतरे होणे गरजेचे आहे.अध्यक्षीय मार्गदर्शनात माजी प्राचार्य विठ्ठल वलेकर म्हणाले, स्वर्गीय आबासाहेबांचे कार्य महासागरासारखे आहे.सांगोला तालुक्याचा पाणी प्रश्न सोडवून आबासाहेबांनी दुष्काळात जन्मलो असलो तरी दुष्काळात मरणार नाही,ही प्रतिज्ञा खरी करून दाखविली. आबासाहेबांचे कार्यकर्त्यांवर फार बारीक लक्ष होते. डॉ. किसन माने यांनी आबासाहेबांचे कार्य ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून चरित्रग्रंथाच्या रूपाने छान मांडले आहे.स्वागत,प्रास्ताविक व सूत्रसंचालन दिगंबर पांढरे यांनी केले. प्रतिमा पूजन व दीप प्रज्ज्वलन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. डॉ. किसन माने यांनी आपल्या मनोगतातून चरित्र लेखनामागची भूमिका स्पष्ट केली. अमोल वलेकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाला स्वर्गीय आबासाहेबांवर प्रेम करणारे सांगोला तालुक्यातील अनेक मान्यवर, महिला व उदनवाडी गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी सौ. चिंगूताई वलेकर, सुहास वलेकर,ग्रंथपाल विजय वलेकर, सौ. लक्ष्मी टिंगरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# इंजि.शिवश्री प्रल्हाद तळेकर यांच्या सेवापूर्ती गौरव समारंभाचे आयोजन

**आष्टी**- तेजस्वी व्यक्तिमत्व आणि उत्तुंग कर्तुत्व ज्यांच्या ठायी स्थित आहे, सुसंस्कृत आचरण, निस्वार्थी समाजकारण ज्यांच्या जगण्याची रीत आहे असे आष्टी तालुक्यातील सुपुत्र जिल्हा परिषदेचे उपअभियंता इंजिअर श्री. प्रल्हाद तळेकर (आप्पा) यांच्या सेवापूर्ती गौरव समारंभाचे आयोजन पंचायत समितीचे गटविकास अधिकारी कर्मचारी वृंद व तळेकर परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे, या गौरव समारंभानिमित्त दि.२ मार्च २०२४ शनिवार रोजी सकाळी ११:३० वाजता आष्टी येथे मोरेश्वर मंगल कार्यालयात या समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच दुसऱ्या दिवशी सेवापूर्ती गौरवाचे औचित्य साधून ३ मार्च रविवारी सांय ७:०० वाजता जिजाऊ मंगल कार्यालय आष्टी येथे महाराष्ट्र शासनाचा सर्वोच्च कंठ घोषित पुरस्कार प्राप्त झालेले श्री.पंडित कल्याणजी गायकवाड यांचा सुमधुर वाणीतून शास्त्रीय संगीत, अभंग वाणी गायनाचा कार्यक्रम



आयोजित करण्यात आला आहे. तरी सर्व संगीत प्रेमी बंधु भगिणींनी उपस्थित राहून सुश्राव्य मौफीलीचा आनंद घ्यावा अशी विनंती करण्यात आली आहे

जिल्हा परिषद बांधकाम विभागामध्ये प्रदीर्घ काळ प्रशासकीय सेवेतील उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. या समारंभासाठी प्रमुख उपस्थिती ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल (अध्यक्ष संत मदन महाराज संस्थान, कडा), माजी राज्यमंत्री आमदार श्री सुरेश (आण्णा) धस, आमदार श्री. बाळासाहेब आजबे (काका), माजी आमदार साहेबराव दरेकर (नाना) , माजी आमदार भिमरावजी धोंडे साहेब मा.श्री. समाजसेवक विजय मामा गोल्हार, माजी. जि.प. सदस्य, देविदास (आबा) धस, मा. इंजि. तान्हाजी जंजीरे (बापु) (ता. अध्यक्ष मराठा सेवा संघ, आष्टी मा. इंजि. बालाजी राजपूत साहेब (कार्यकारी अभियंता जि.प.बीड) हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या सेवापूर्ती गौरव सोहळ्यामध्ये अनावश्यक खर्चाला फाटा देऊन फक्त पुस्तकाच्या स्वरूपात भेटवस्तु स्विकारण्यात येतील अशी माहिती गौरव समितीच्या वतीने देण्यात आली आहे.

# खासदार असावा तर सुप्रिया सुळें सारखा:युवकांनी मानले आभार

## शहरातील विकास कामांच्या मागण्या तात्काळ मार्गी लावण्याचे सुळेंचे आश्वासन

**पुणे**-बारामती लोकसभा मतदारसंघाच्या खासदार सुप्रिया सुळे इंदापूर तालुक्याच्या दौऱ्यावर असताना इंदापूर शहरातील युवकांनी त्यांचा ताफा रस्त्यावर थांबवून त्यांना शहरातील विविध समस्यांचे लेखी निवेदन दिले.आणि शहराच्या विकास कामाबाबत काही मागण्या केल्या. तसेच युवा कार्यकर्ते राहुल गुंडेकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सुप्रिया सुळे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की इंदापूर शहरात मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलची अत्यंत गरज असून शहरात इतरही तालुक्यातून पेशंट येत असतात परंतु मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलची येथे कसली सुविधा नसल्याने त्यांना पुणे, बारामती,आकलुज या ठिकाणी बाहेरगावी



जावे लागत आहे. तरी पेशंटची अतिशय हेडसांड होत आहे.त्यामुळे इंदापूर शहरात अद्यावत असे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल करण्यात यावे.

तसेच इंदापूर शहरात अनेक बेरोजगार युवक असून त्यांना रोजगार मिळण्यासाठी उद्योग व्यवसाय इंदापूर शहराच्या आसपास व्हावेत.लहान मुलांना उद्यान, क्रीडांगण, विद्यार्थ्यांना वाचनालयची शहरात अद्यावत सोय व्हावी.जेष्ठ नागरिकांसाठी ट्रँक,बगिचा आणि गोरगरीब शाळेतील मुलांसाठी अद्यावत असे वसतिगृह व्हावे आदी मागण्या खासदार सुप्रिया सुळे यांच्याकडे केल्या त्यावर खासदार सुप्रिया सुळे यांनी आपल्या इंदापूर शहरातील सर्वच्या सर्व मागण्या तात्काळ मार्गी लावून पूर्ण केल्या जातील असे आश्वास युवकांना दिले. त्यामुळे सर्व युवकांनी खासदार सुप्रिया सुळे यांचे आभार मानून खासदार असावा तर सुप्रिया सुळें सारखा अशा प्रतिक्रिया बोलून दाखवल्या.यावेळी इंदापूर शहरातील मोठ्या संख्येने युवक कार्यकर्ते उपस्थित होते.

# सेलू तहसील समोर बेकायदेशीर गुटखा व वाळू उपसा बंदी करता साखळी उपोषण



**सेलू**-तालुक्यातील घोडके पिंपरी,वाघ पिंपरी,खूपसा,मोरेगाव राजवडी गावांच्या परिसरात नदीचा विस्तार झाला असून या नदीपात्रातून बेकायदेशीर वाळू उपसा दिवस-रात्र चालू आहे. ह्या अमर्यादित होणाऱ्या वाळू उपसा थांबवावा म्हणून बेकायदेशीर वाळू उपसा विरोधात साखळी उपोषण करण्यात आले सेलू तालुक्यात अवैध्य वाळू विक्री व गुटखा विक्री बेकायदेशीरपणे चालू असून त्यावर कारवाई करण्याबाबत सेलू येथे किशोर मुक्तावार व सुनील चव्हाण यांनी आज दिनांक २८ फेब्रुवारी रोजी सेलू तहसील कार्यालयासमोर साखळी उपोषण करत नायब तहसीलदार विजयकुमार मोरे यांना निवेदन दिले.

# परिवर्तनवादी संतांच्या मानवतावादी विचारानेच आज देश एकसंघ-डॉ.गोपाल बछिरे




लोणार-२७ स्वातंत्र्यपूर्व काळापासून परिवर्तनवादी संतांच्या शिकवणीमुळे त्यांच्या कार्यामुळे आज देश एकसंघ असे प्रतिपादन डॉ. गोपाल बछिरे यांनी केले.

पांगरा डोळे येथे गुरु रविदास तसेच भगवान बाबा यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त डॉ. बच्छिरे प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते प्रा. विठ्ठल भानुसे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या जयंती समारंभात डॉ.बछिरे पुढे म्हणाले परिवर्तनवादी संतांनी समाजातील अंधश्रद्धा कर्मकांड व जातीयवादाच्या विरोधात कडाडून टीका करत आपले दोहे, अभंगाच्या माध्यमातून समाज जागृतीचे कार्य करून सर्वसामान्यांना स्वयंप्रकाशित होण्याचा मंत्र दिला, संत बसवेश्वर, संत नामदेव, संत रविदास संत कबीर संत तुकाराम संत गोरोबा, संत सावता, संत नरहरी, संत चोखामेळा, संत भगवान बाबा या संतांनी सदा समाजातील दुरावा कमी करून विज्ञानवादी दृष्टिकोन देऊन शिक्षणाकडे वळवण्याचा व स्वयंप्रकाशित होण्याचा मार्ग दाखविला .संपूर्ण पांगरा डोळे वासियांनी मिळून हा जयंतीचा कार्यक्रम आयोजित केला होता व या कार्यक्रमास पुरुषांसोबत महिला भगिनींची उपस्थिती लक्षणीय होती याप्रसंगी मंचकावर सरपंच प्रशांत डोळे, उपसरपंच आकाश डोळे, माजी सरपंच शंकर डोळे, माजी सरपंच गजानन खुशालराव डोळे, पोलीस पाटील गजानन डोळे, ग्रा. प.सदस्य राहुल नरवडे, देविदास चाटे, ग्रामविकास अधिकारी गजानन भाग्यवंत, भास्कर नरवडे संतोष गिरे जगन्नाथ डोळे नारायण ढाकणे, प्रकाश डोळे, शिवशंकर आघाव, प्रकाश डोळे, विलास कालापाड, भगवान कायंदे, आदी उपस्थित होते या कार्यक्रमास यशस्वी करण्यासाठी रामेश्वर फुलसावंगे,शिवाजी राजगुरू, श्रावण बोरुडे, शंकर बोरुडे, गोपाल बोरुडे, संतोष बोरुडे, सोपान बोरुडे व भीमयोद्धा मित्र मंडळ यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परमेश्वर फुलसावंगे यांनी केले तर आभार नारायण नरवडे यांनी मानले

# शिवस्वराज्य युवा संघटनेचा पुरस्कार सोहळा संपन्न

**पंढरपूर । प्रतिनिधी**

पंढरपूर येथील योगभवन सभागृह येथे प्रमुख मान्यवरांच्या हस्ते प्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. आणि नंतर शिवस्वराज्य 'पंढरीरत्न' पुरस्कार वितरण सोहळ्याला सुरूवात करण्यात आली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीचे ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज देशमुख (जळगांवकर) होते. तर कार्यक्रमांचे मुख्यअतिथी पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा सदस्य आमदार आवताडे यांचे बंधू कृषी उत्पन्न बाजार समितीचे विद्यमान सभापती सोमनाथ आवताडे, शिवस्वराज्य युवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदिपराजे मुटकुळे-पाटील, शिंदे गटाचे मोहोळ तालुकाध्यक्ष राजाभाऊ खरे, विठ्ठल सह. साखर कारखानाचे चेअरमन अभिजीत पाटील, शिव संघर्ष ग्रुपचे पदाधिकारी समाजसेवक सुरेश पाटील, ठाणे महापालिक आयुक्त अभिजीत बापट, नगरसेवक सुनिलजी डोंबे, मराठा क्रांती ठोक मोर्चाचे समन्वयक रामभाऊ गायकवाड, संभाजी ब्रिगेडचे प्रदेश संघटक दिपक वाडदेकर, नगरसेवक महादेव धोत्रे, नगरसेवक ऋषिकेश भालेराव, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस सचिव शंकर सुरवसे, समाजसेविका अनिता पवार, पंढरपूर सह्याद्री प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष विनोदराज लटके, शिवक्रांती युवा संघटनेचे संस्थापक दत्तात्रय काळे, प्रदेश सरचिटणीस छावा क्रांतिवीर सेना धनराज लटके, शिवसेना शिंदे गट पंढरपूर युवा शहरप्रमुख सुमित शिंदे, पंढरपूर छावा उपजिल्हाध्यक्ष भास्कर जगताप, छावाचे पंढरपूर शहराध्यक्ष सागर चव्हाण, संभाजी ब्रिगेडचे पंढरपूर शहराध्यक्ष शनी घुले, समाजसेवक अनिल मोरे, काँग्रेस सेवा दल पंढरपूर शहराध्यक्ष गणेश माने, समाजसेवक सोपान काकासाहेब देशमुख हे उपस्थित होते. शिवस्वराज्य युवा संघटनेच्या वतीने शिवस्वराज्य 'पंढरीरत्न' पुरस्कार सोहळ्यांचे मानकरी, म्हणून उत्कृष्ट पंढरपूर शहराच्या प्रथम महिला नगराध्यक्षा साधनाताई भोसले, उत्कृष्ट पत्रकारिता सुरेखाताई भालेराव (नागटिळक), उत्कृष्ट सिनेमा कलाकार सुवर्णा भारती, उत्कृष्ट पोलिस प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत गोसावी (चिंचपूर इजदे) उत्कृष्ट पोलिस प्रशासकीय महिला अधिकारी सारिका रामचंद्र शिंदे (सांगली) उत्कृष्ट शस्त्र व युद्धकला अभ्यासक गिताताई थोरात (सोळंके) उत्कृष्ट वकील अँड संगिताताई संजय नरळे, उत्कृष्ट आदर्श शैक्षणिक शिक्षका संजनाताई सातपुते, उत्कृष्ट उद्योजिका रेश्माताई माळी,उत्कृष्ट डॉ.वैद्यकीय राजश्रीताई सालविठ्ठल, उत्कृष्ट सामाजिक संस्था हेमाताई लाळगे (गावडे), उत्कृष्ट सायकल



मॅरेथॉन सागर शरद कदम, उत्कृष्ट अंपगांसाठी कामगिरी सेवा आकुताई उलभगत, उत्कृष्ट साहित्य लेखिका शोभाताई भारत माळवे, वारकरी संप्रदाय कीर्तनकार ह.भ.प.आर्चनाताई वेदपाठक, उत्कृष्ट फोटोग्राफी डिझाईन विठ्ठल तानाजी रोकडे, उत्कृष्ट सूत्रसंचालक श्वेताताई हुल्ले, जेष्ठ समाजसेवक संजय ननवरे, उत्कृष्ट प्रगतीशील फळबाग शेतकरी सारिका शिंदे, उत्कृष्ट निर्सगप्रेमी आनंद नगरकर, उत्कृष्ट युवा उद्योजक उध्दव बाबर, उत्कृष्ट समाजसेवक संजय कौलावर, उत्कृष्ट कोरोना योध्दा अनिता पवार, उत्कृष्ट मराठा समाजरत्न महेश डोंगरे-पाटील, उत्कृष्ट तलाठी सेवक अक्षय चव्हाण, उत्कृष्ट नगरपरिषद प्रशासकीय अधिकारी सुनिल वाळूजकर यांना शिवस्वराज्य पंढरीरत्न विशेष पुरस्काराने गौरविण्यात आले. अशी माहीती शिवस्वराज्य युवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदिपराजे मुटकुळे-पाटील, संस्थापक सचिव चैतन्य(भैय्यासाहेब) शिंदे, संस्थापक खजिनदार विशाल शिंदे, संस्थापक कार्यध्यक्ष महेंद्र मराठे, शिवस्वराज्य युवा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष राजेंद्र किंटे शिवस्वराज्य युवा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष मोहन भाऊ बागल, शिवस्वराज्य युवा संघटन महिला प्रदेशाध्यक्ष मिराताई कोलटेके, शिवस्वराज्य धाराशिव जिल्हाध्यक्षा राजकन्या जावळे पाटील, खानापूर तालुकाध्याक्षा स्वातीताई सुर्यवंशी, पंढरपूर शहराध्यक्ष किरण शिंदे, मेहकर तालुकाध्याक्ष शंकर गजानन नागरे, सोलापूर उपजिल्हाध्यक्ष रविराज मुटकुळे, पंढरपूर शहराध्यक्ष किरण शिंदे, माढा तालुकाध्याक्ष सागर ढवळे-पाटील पंढरपूर युवक तालुकाध्याक्ष रोहन नरसाळे, देवराज युवा मंचाचे संस्थापक अध्यक्ष शहाजी शिंदे, सौरभ जाधव यांनी दिली. शिवस्वराज्य पंढरीरत्न सोहळ्यांचे सूत्रसंचालन मेटकरी मॅडम यांनी केले तर आभारप्रदर्शन शिवस्वराज्य युवा संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष अधिकराव लोखंडे यांनी मानले. या वेळी शिवस्वराज्य युवा संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते महाराष्ट्रातून मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नक्षलग्रस्त भागातील तरुणाची भरारी

# रामटेके यांची संशोधन सहयोगी म्हणून निवड

**आलापल्ली । प्रतिनिधी**

जिद्द व त्याला मेहनतीची जोड असेल तर कुठलीही गोष्ट अशक्य नाही हे आपण नेहमीच ऐकत असतो. पण गडचिरोली मधील एका विद्यार्थ्याने ही बाब खरी करून दाखविली आहे.मेहनतीच्या जोरावर अत्यंत कठीण परिस्थितीवर मात करत भारतीय मानवविज्ञान सर्वेक्षण मधील भौतिक मानववंशशास्त्र विभागात संशोधन सहयोगी पदाला गवसणी घातली.गट-ब चे रिसर्च ऑफिसर एकंदरीत कनिष्ठ शास्त्रज्ञ म्हणून नियुक्ती झाल्याने गडचिरोलीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

सिरोंचा तालुक्यातील आदिवासीबहुल व अतिदुर्गम कोटापल्ली हा गणेश चंद्रू रामटेके यांचा मूळ गाव.आजही हा परिसर अत्यंत दुर्गम भाग म्हणून ओळखला जातो.वडील शेतमजूर असून घरची अत्यंत हलाखीची परिस्थिती.त्यामुळे गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेतच त्यांनी सातवी पर्यंतचा शिक्षण घेतला.त्यानंतर गावात पुढील शिक्षणाची सोय नसल्याने जवळपास ५० ते ६० किलोमीटर अंतरावर असलेल्या सिरोंचा तालुका मुख्यालयातील भगवंतराव हायस्कुल मधून त्यांनी वसतिगृहात राहून इयत्ता दहावी पर्यंतचे शिक्षण घेतले.घरची हलाखीची परिस्थिती मात्र अभ्यासात हुशार असल्याने वसतिगृहातील सिनियर विध्यार्थी आणि गुरुजनांच्या मार्गदर्शनात त्यांनी पुढील शिक्षणासाठी थेट पुणे गाठले.



समाजकल्याणच्या वसतिगृहात राहून त्यांनी नेताजी सुभाष चंद्र बोस विद्यालय,येरवडा (पुणे) येथे विज्ञान शाखेतून अकरावी व बारावीचे शिक्षण पूर्ण केले.त्यानंतर फर्ग्युसन कॉलेज मधून झुलॉजी विषयातून बी.एस.सी पूर्ण केला. त्यानंतर सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हर्सिटी मधून मानववंशशास्त्र विषयातून एम.एस.सी पूर्ण केले. २०२० मध्ये त्यांनी नेट परीक्षा पास करून ते सध्या भारतीय मानव विज्ञान सर्वेक्षण मधील सीआरसी नागपूर येथे सिनियर रिसर्च फेलो म्हणून काम करत आहेत.आता त्यांची भौतिक मानववंशशास्त्र विभागात संशोधन सहयोगी म्हणून नियुक्ती झाली आहे.नुकतेच २६ फेब्रुवारी रोजी नियुक्ती आदेश मिळाले असून पुढील आठवड्यात ते रुजू होणार आहेत.विशेष म्हणजे मोलमजुरी करणाऱ्या चन्द्रु रामटेके यांना दोन मुले आणि एक मुलगी असे तीन अपत्य असून घरची परिस्थिती बेताची होती.त्यामुळे गणेश ला प्राथमिक शिक्षण घेणे सुद्धा कठीण होते.गणेश यांच्या अशिक्षित वडिलांना मुलाने उच्च शिक्षण घ्यावे असे वाटायचे. म्हणून त्यांनी पोटाला चिमटा घेत मुलाला शिकवले.१० वि नंतर थेट पुणे गाठलेल्या गणेश ने कधीच मागे वळून बघितला नाही.त्याने जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर यश संपादन केले आहे.भारतीय मानवविज्ञान सर्वेक्षण हे भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत असून याचे मुख्यालय कोलकाता येथे आहे आणि याचे काही मोजके लहान प्रादेशिक केंद्र आणि उपकेंद्र आहेत.गणेश रामटेके हा गडचिरोली जिल्ह्यातील कदाचित पहिलाच विध्यार्थी आहे ज्याने या पदाला गवसणी घातली.त्यामुळे सर्व स्तरावरून त्याचे कौतुक केले जात आहे.

# संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावण बाळ योजने अंतर्गत मासिक आढावा सभेमध्ये १६२ प्रकरणे मंजूर



**मूल । प्रतिनिधी**

शासनाने निराधार,अपंग,वृद्धलोकांसाठी संजय गांधी निराधार योजना समितीच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य देण्याची योजना कार्यन्वित केली आहे.त्या अनुषंगाने मूल तालुक्यात असलेल्या संजय गांधी निराधार समितीची दिनांक २८ फेब्रुवारी २०२४ ला मासिक आढावा सभा वंदना अगरकाटे यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचं आयोजन करण्यात आले होते .

संजय गांधी निराधार योजने अंतर्गत विविध योजनांचे अर्ज मंजूर करण्यात आले.श्रावणबाळ- ८४ प्रकरणे ,वृद्धापकाळ-१३ प्रकरणे , संगायो निराधार -४७ प्रकरणे, इंगायो विधवा-१८ प्रकरणे, इंगायो अपंग-०० असे एकूण १६२ प्रकरणे मंजूर करण्यात आले.साधक बाधक चर्चा झाली.यावेळी वंदना अगरकाटे अध्यक्ष ,पूजा डोहने सदस्य,उर्मिला कडस्कर सदस्य, राकेश ठाकरे सदस्य मुन्ना कोटगले सदस्य,अनुप नेरलवार सदस्य,दिलीप पाल सदस्य,नितीन गुरनुले सदस्य,नामदेव कावळे सदस्य,नायब तहसीलदार संगायो मूल, संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती मुल, मुख्याधिकारी नगरपरिषद मूल उपस्थित होते.

# आजनसारा येथे राज्यस्तरीय खंजरी भजन स्पर्धेचे आयोजन

**आजनसरा । प्रतिनिधी**

महान तपस्वी अवलिया संत सोनामता यांच्या पुण्यतिथी निमित्य श्री संत भोजाजी महाराज ट्रस्ट च्या वतीने १ मार्च पासून ५ मार्च पर्यंत राज्यस्तरीय खंजरी भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.कार्यकमाचे उदघाट्न २९ फेब्रुवारीला करण्यात आले असून उदघाटक म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आश्रम गुरुकुंज मोझरी चे सर्वाधिकारी लक्ष्मणराव गमे, प्रचार विभाग प्रमुख प्रकाश महाराज वाघ उप सर्वाधिकारी दामोधरदास पाटील, गुरुदेव प्रचारक नानासाहेब येणोरकर, जेष्ठ गुरुदेव सेवक वसंतराव मोहिते पाटील विश्वस्त मंडळ व संत भोजाजी महाराज देवस्थान चे अध्यक्ष डॉ. विजय पर्बत विश्वस्त मंडळ व भाविक भक्तांची उपस्थिती होती.



दैनंदिन कार्यक्रमात ध्यान, काकडा, आरती, हरिपाठ प्रार्थना खंजरी भजन स्पर्धा व कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे,५ मार्च ला दुफारी १ वाजता श्रीं च्या पालखीची मिरवणूक निघणार असून, दहीहंडी व खंजरी भजन स्पर्धेचे बक्षीस वितरण होणार आहे.त्या नंतर भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.स्पर्धेत पुरुष शहरी विभागाकडून प्रथम बक्षीस २१ हजार १ रुपये असून एकूण १० बक्षीस ठेवण्यात आले आहे, महिला विभागाकडून १३ बक्षीस असून प्रथम बक्षीस १५हजार १ रुपये पुरुष ग्रामीण विभागाकडून प्रथम बक्षीस १५ हजार रुपये असून एकूण १३ बक्षीस ठेवण्यात आले आहेत, बालविभागात सुद्धा प्रथम बक्षीस १५ हजार असून एकूण १२ बक्षीस ठेवण्यात आले आहेत.तसेच उत्कृष्ठ तबला वादक, उत्कृष्ठ हार्मोनीयम वादक, उत्कृष्ठ खंजरी वादक, उत्कृष्ठ गायक साठी विशेष बक्षीस ठेवण्यात आले आहे, स्पर्धकांनी नोंदणीसाठी हंसराज तिमांडे, शंकर ठाकरे, संजय कोसूरकर, विष्णू सोनवने, प्रभाकर पारवटकर, मुन्ना शेंगर, यांच्या सोबत सम्पर्क करायचा आहे. स्पर्धकांनी मोठ्या संख्येत भाग घेण्याचे आवाहन देवस्थाचे अध्यक्ष डॉ. विजय पर्बत, उपाध्यक्ष धनराज मेश्राम, सचिव शिवदासजी पर्बत, सह सचिव राजेंद्र ढवळे, कोषाध्यक्ष नामदेव गाढवे, सहकोषाध्यक्ष रमेश ठाकरे, विश्वस्त रामाजी कोपरकर, विनोद आष्टनकर, श्रावण काचोळे, महेश कोसूरकर, शालिनी ईखार, सभासद अंकुश ढवळे, संतोष सुपारे यांनी केले आहे.

# थाटेश्वर येथे महाशिवरात्री यात्रा महोत्सवाला सुरुवात

**आजनसरा । प्रतिनिधी**

नजीकच्या थाटेश्वर येथील शिवशंकर मारोती देवस्थान मध्ये महाशिवरात्री निमित्य २९ फेब्रुवारी पासून महोत्सवाला सुरवात करण्यात आली असून १० मार्च पर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. वर्धा आणि यशोदा या दोन नद्यांच्या संगम तिरावर असलेल्या थाटेश्वर या शंकर व मारुती देवस्थानात दरवर्षी महाशिवरात्रीनिमित्त यात्रा महोत्सव साजरा करण्यात येतो. थाटेश्वर हे देवस्थान सावंगी (रीठ) आजनसरा नावाने प्रख्यात असून येथे पुरातन काळातील हेमाडपंथी शिव मंदिर प्रस्थापित आहे. हे शिवमंदिर वर्धा आणि यशोदा या दोन नद्यांच्या संगम तिरावर विराजमान असल्याने येथील निसर्गरम्य असा परिसर आहे काही वर्षांपूर्वी येथील पुरातन मंदिर क्षतिग्रस्त झाले होते परंतु भाविक भक्तांनी सढळ हाताने देणगी दिल्यामुळे २०१६ साली मंदिराचे नवनिर्माण करण्यात आले. सोबतच या ठिकाणी विठ्ठल रुक्मिणीचे पंचवीस फूट उंचीचे मंदिर विराजमान आहे.हे स्थळ जागृत देवस्थान म्हणून मानल्या जाते. भाविक भक्त मोठ्या श्रद्धेने नवस घेऊन या ठिकाणी आपला नवस फेडण्यासाठी येत असतात. प्रभू रामचंद्र वनवासात जात असताना यशोदा व वर्धा नदीच्या संगमावर आले.तेव्हा संगमातून स्वयंभू पंचधारा उत्पन्न होऊन प्रभुरामचंद्राणी या स्थळी शंकरजीना अलिंगन दिले अशी आख्यायिका काशीशिवपुराणात आहे. यावरून हे स्थळ प्रभूरामचंद्र,प्रभू शिवशंकर यांचे क्रीडा स्थळ म्हणून प्रसिद्ध आहे. तसेच या स्थळाला पंचवटी म्हणून ही संबोधल्या जाते. या स्थळी कर्मयोगी बापूसाहेब घुळघूळे (पाटील) यांची स्मृती समाधी निस्वार्थाची प्रेरणा देत आहे.



यास्थळी २९ फेब्रुवारीपासून बारा स्कंदी भागवत अखंड पारायण फुकटा निवासी मंडळा कडून सुरु करण्यात आले आहे. समारोपीय कीर्तन ह.भ.प.श्री गुजरकर महाराज येरणगाव यांचे राहणार आहे,१० मार्च रोजी भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.महाशिवरात्री यात्रा महोत्सवाचा परिसरातील सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा,असे आवाहन अध्यक्ष व संचालक मंडळाकडून करण्यात आले आहे.

# राष्ट्रीय अबॅकस परीक्षेत सांगोल्याच्या शिवकन्या शिवांजली शिनगारे व अरोही चव्हाण राज्यात प्रथम अदिराज अबॅकस क्लासेस चा विजयाचा झेंडा कायम

**सांगोला । प्रतिनिधी**

मेट्रो ब्रेन अबॅकस कंपनीतर्फे घेण्यात आलेली सहावी नॅशनल लेवल अबॅकस परीक्षा २०२४ (२५ फेब्रुवारी )वार रविवार रोजी लातूर या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती यामध्ये संपूर्ण महाराष्ट्रातून व बाहेर राज्यातील अशी एकूण २५०० विद्यार्थी जवळपास ३००० पालक व २०० शिक्षक सहभागी होते यामध्ये आदिराज अबॅकस क्लासेसच्या २५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता तरनठ लेवलमध्ये शिवांजली सोमनाथ शिंगारे व आरोही सचिन चव्हाण या विद्यार्थिनींनी सहा मिनिटात शंभर प्रश्न सोडवून राज्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे तसेच.नठ, न, -रपव इ मध्ये सहभागी असलेल्या विद्यार्थ्यांनी(1st,2nd,3rd) रँक प्राप्त केला आहे तसेच या क्लासेसच्या संचालिका सौ.दिपाली कोळसे पाटील मॅडम यांनm(Top Franchise the year award -2024) चा अवार्ड देण्यात आला या संपूर्ण कार्यक्रमाचे बक्षीस वितरण सायंकाळी पाच वाजता परीक्षा केंद्रावरच पारितोषिक वितरण सोहळा पार पडला या समारंभाचे विशेष आकर्षण म्हणजे माधुरी





पवार मराठी सिने अभिनेत्री तथा प्रसिद्ध नृत्यंगणा व ओम (सुभाष) यादव मराठी अभिनेता तथा हास्य कलाकार यांची उपस्थिती होती. कंपनीच्या मॅनेजिंग डायरेक्टर सौ सीमा संतोष लोहारे मॅडम या कार्यक्रमाचे अध्यक्ष मेट्रो ब्रेन अबॅकस कंपनीचे डायरेक्टर श्री संतोष लोहारे सर उद्घाटक विक्रम गोजमगुंडे ( माजी महापौर मनपा लातूर )श्री अजित भैया पाटील कव्हेकर (भा.ज. प्रदेश उपाध्यक्ष) यांच्या उपस्थितीत बक्षीस वितरण समारंभ संपन्न झाला.सांनवी कांबळे ,आरव लांडगे , रितेश राजवाडे,अदिराज कोळसे पाटील, रुद्र विभुते(1st and 2nd rank) लेवलनुसार प्राप्त केला आहे.प्रेम मिसाळ ,दिग्विजय जगताप, प्रभास गोडसे ,सारा मोरे ,स्वयंम बनसोडे, यशराज इंगोले ,राजलक्ष्मी इंगवले ,अनस इनामदार, आरुषी शिंदे , प्रभास गोडसे, रुद्र विभुते ,आराध्या पवार , श्रुती माळी ,भावना इंगोले, अक्षरा नवले ,सोहम जाधव , प्रचिती गोडसे,राधेय शिरसागर या विद्यार्थ्यांना Achiever trophy, गोल्ड मेडल व प्रशस्तीपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

# राज्यातील सर्वात मोठे गाव चलो अभियान सांगोल्यात राबविले-चेतनसिंह केदार-सावंत

**सांगोला । प्रतिनिधी**

आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उत्तम संघटनात्मक बांधणी करत, विकासाचा अजेंडा डोळ्यासमोर ठेवून भाजपतर्फे गाव चलो अभियान राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर सुमारे ५ हजार भाजप कार्यकर्त्यांनी सांगोल्यात व्यापक जनसंपर्कासाठी गाव चलो अभियान राबविण्यात आले असून राज्यातील सर्वात मोठे अभियान सांगोल्यात राबविण्यात आले असल्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांनी दिली.

यावेळी बोलताना चेतनसिंह केदार सावंत म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारने विविध क्षेत्रात दमदार कामगिरी केली. सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास हीच मोदींची गॅरंटी असल्याने आज भारत जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे. त्यात गेल्या दीड वर्षांपासून राज्यातील महायुती सरकारनेही



महाराष्ट्राला प्रगतीपथावर नेले आहे आहे. केंद्र व राज्य सरकारच्या योजना शहरातील प्रत्येक बूथवरील लाभार्थीपर्यंत पोचविण्यासाठी गाव चलो अभियान हाती घेण्यात आले आहे. राज्यातील सर्वात मोठे गाव चलो अभियान सांगोला तालुक्यात राबविण्यात आले आहे. या अभियानात जिल्ह्यातील सुमारे ५ हजार भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते. या दरम्यान, भाजपच्या कार्यकर्त्यांनी पाच हजार ठिकाणी दिवार लेखन करण्यात आले असल्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी दिली.

# नाझरा विद्यामंदिर इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये पालकांसाठी कार्यशाळा संपन्न

## पालकांनी मुलांना भावनिक पातळीवर समजून घ्यावे-सुनील जवंजाळ

**नाझरा । वार्ताहार**

मुलांच्या सर्वांगीण विकासात शाळेचा,समाजाचा व पालकांचा महत्त्वाचा वाटा असतो. खर तर या सर्वांमध्ये पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते.घरात वावरणारा आपला पाल्य भावनिक दृष्ट्या सुदृढ होण्यासाठी प्रत्येक पालकांनी आपल्या मुलाला भावनिक पातळीवर समजून घ्यायला हवे असे प्रतिपादन कवी सुनील जवंजाळ यांनी केले. नाझरा विद्यामंदिर इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये आयोजित केलेल्या पालकांच्या कार्यशाळेत प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.यावेळी व्यासपीठावर प्राचार्य मंगल पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना श्री. जवंजाळ म्हणाले की सध्या स्पर्धेच्या युगात आपला पाल्य सतत पुढे असायला हवा अशी



पालकांची प्रचंड इच्छा असते त्यासाठी ते सातत्याने आपल्या पाल्यावर अभ्यास करण्याबाबतचे दबाव तंत्र वापरत असतात. खरंतर आपल्या पाल्याला आपण भावनिक पातळीवर समजून घ्यायला हवे, त्याची बुद्धिमत्ता, त्याची आवड व त्याची गुणवत्ता यानुसार त्याला क्षण घेण्यासाठी प्रोत्साहित करायला हवे.तुम्हाला काय आवडते यापेक्षा आपल्या मुलाला काय आवडते हे अत्यंत महत्त्वाचे आहे. यावेळी त्यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून पालक आणि बालक यांचा संवाद आणि त्यांच्या संवादातून होणारी शैक्षणिक उन्नती याबाबत विस्तृत मार्गदर्शन केले.यावेळी राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या रांगोळी स्पर्धा व प्रश्नमंजुषा स्पर्धा यातील यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदाटे मॅडमनी केले तर आभार यांनी सरगर मॅडम यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नाझरा विद्यामंदिर इंग्लिश मीडियम स्कूल मधील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.सदर पालक कार्यशाळेस १०० च्या वरती पालक उपस्थित होते. अनेक पालकांनी कार्यशाळेबाबत समाधान व्यक्त करत इंग्लिश मीडियम स्कूलच्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल धन्यवाद दिले.

# दीक्षाभूमीच्या विकासासाठी घोषित ५६ कोटी ९० लक्ष रुपयांच्या अंतिम टप्प्यात असलेल्या निविदेला मंजूरी द्या-आ.किशोर जोरगेवार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

दिक्षाभुमीच्या विकासासाठी ५६ कोटी ९० लक्ष रुपयांची घोषणा करण्यात आली आहे. हा प्रस्ताव शेवटच्या टप्प्यात असुन असुन तात्काळ सदर कामालाच्या निविदेला मंजुर प्रदान करण्यात यावी अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात बोलताना केली आहे.

चंद्रपूर येथील पवित्र दिक्षाभुमीच्या विकासासाठी आमदार किशोर जोरगेवार यांचे सातत्याने प्रयत्न सुरु आहे. सदर विकासकामासाठी १०० कोटी रुपयांचा निधी देण्याची मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी केली होती. दरम्यान या कामासाठी ५६ कोटी ९० लक्ष रुपयांचा निधीची घोषणा करण्यात आली असुन सदर प्रस्ताव अंतिम टप्प्यात आहे. मात्र आमची मागणी १०० कोटी रुपयांची होती. यातील केवळ ५७ कोटी रुपयांची घोषणा करण्यात आली आहे. त्यामुळे उर्वरित निधीही मंजूर करण्यात यावा अशी मागणी अधिवेशनात बोलतांना आमदार किशोर जोरगेवार यांनी केली आहे.यावेळी बोलताना ते म्हणाले कि, नागपूर नंतर केवळ चंद्रपूरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिक्षा दिली. नागपूर येथील दिक्षाभुमीचा विकास झाला. मात्र चंद्रपूर येथील दिक्षाभुमीचा अपेक्षित असा विकास झालेला नाही. त्यामुळे सदर दिक्षाभुमीचा विकास करण्यासाठी शासनाने प्रयत्न करावे असेही ते यावेळी म्हणाले.चंद्रपूर सह सर्व विज उत्पादक जिल्हांना घरगुती वापरातील २०० युनिट विज मोफत देण्यात यावी ही मागणी पुन्हा एकदा अर्थसंकल्पीय अधिवेशनात बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी केली. यावर बोलतांना आ. जोरगेवार म्हणाले कि, जगातील सर्वात प्रदूषित असलेली थर्मल ऍनर्जी आम्ही निर्माण करतो. परिणामी प्रदुषण वाढत आहे. चंद्रपूर जिल्हाचा विचार केल्यास २०२३ मध्ये ३० दिवसांपैकी ३० दिवस प्रदूषित होते. त्यामुळे श्वसनाचे, हृदयाचे आजार निर्माण होत आहे. ही बाब लक्षात घेता प्रदूषण नियत्रंण स्मॉग टावर उभारण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. सोबच उपमुख्यमंत्री यांनी सोलर एनर्जी च्या माध्यमातुन ३०० युनिट मोफत देण्याची घोषणा केली आहे. मात्र या प्रक्रियेला वेळ लागणार आहे. त्यामुळे सर्व विज उत्पादक जिल्हांना २०० युनिट विज मोफत द्यावी अशी मागणी त्यांनी पून्हा एकदा अधिवेशनात केली आहे. सुरजागड येथे सर्वोतम दर्जाचे लोहखनिज मिळाले आहे. त्यामुळे लोहखनिजवर आधारीत उद्योग चंद्रपूरात सुरु करण्यात यावे असेही योवेळी ते म्हणाले.



# ताडोबाला जागतिक स्तरावर पोहचविण्यात योगदान देणाऱ्यांचा ताडोबा महोत्सवात सन्मान करा-आ.जोरगेवार

## क्षेत्र संचालक डॉ.जितेंद्र रामगावकर यांना सूचना

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जगप्रसिध्द ताडोबा व्याघ्र प्रकल्पाला जागतिक स्तरावर पोहचविण्यास वन्यप्राणी छायाचित्रकार, पत्रकार, वन्यजीव संरक्षण संस्था, वन विभागाचे सर्व अधिकारी कर्मचारी व जंगलांचे संरक्षण करणारे स्थानिक नागरिकांचे मोठे योगदान राहिले आहे. त्यामुळे चंद्रपूरात आयोजित ताडोबा महोत्सवात त्यांचा सत्कार करण्यात यावा अशा सुचना आमदार किशोर जोरगेवार यांनी वनसंरक्षक तथा ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक डॉ. जितेंद्र रामगावकर यांना केल्या आहे. सदर पत्रही त्यांनी पाठवले आहे.

वन विभागाच्या वतीने ताडोबा महोत्सव २०२४ चे आयोजन १ मार्च ते ३ मार्च २०२४ दरम्यान करण्यात आले आहे. ताडोबा महोत्सव २०२४ चे उद्दिष्ट ताडोबाची यशोगाथा साजरी करणे आणि ती जागतिक मंचावर प्रकाशित करणे हि आहे. मात्र सदर महोत्सव साजरा करत असतांना ताडोबा व्याघ्रप्रकल्पातील प्राण्यांचे छायाचित्र आपल्या कॅमेर्यात टिपून येथील सौंदर्य जगात पोहोचविणार्या वन्यजीव छायाचित्रकरांचा विसर पडता कामा नये. त्यासोबतच अनेक पत्रकार वृतांकनच्या माध्यमातून ताडोब्याच्या प्रसिद्धीसाठी काम करीत आहे. तसेच वन्यजीव संस्था वन विभागातील कर्मचारी - अधिकारी यांच्या खांद्याला खांदा लावून वन्य प्राणी संरक्षणाचे ईश्वरीय कार्य करीत आहे. येथील स्थानिक नागरिकांनी या वनसंपत्तीचे संरक्षण केले आहे. यांच्या एकत्रित योगदानामुळेच आज ताडोबा व्याघ्रप्रकल्प जागतिक स्तरावर पोहचले आहे. या सर्वांच्या सामुहिक योगदानाशिवाय ताडोबा महोत्सवाची संकल्पनाच अपुरी राहील त्यामुळे अश्या आयोजनात ताडोबाच्या प्रसिद्धीत, संरक्षणात उल्लेखनीय योगदान असलेल्या या सर्व घटकांचा यथोचित सन्मान करून त्यांच्या सेवाकार्याची पावती देण्यात यावी अशा सूचना त्यांनी क्षेत्र संचालक डॉ जितेंद्र रामगावकर यांना पाठविलेल्या पत्रातुन केल्या आहे.

# अनिरुद्ध वनकर यांच्या गायनाने गांधी चौक मंत्रमुग्ध

**चंद्रपूर । प्रतिनिधी**



स्थानिक गांधी चौक येथे बहुजन विचार मंचाच्या वतीने तीन दिवसीय प्रबोधनात्मक कार्यक्रम संपन्न झाला. अनिरुद्ध वनकर दिग्दर्शित व महात्मा फुले लिखित तृतीय रत्न हे नाटक व वनकारांच्या संचाने दुसऱ्या दिवशी वादळ वारा हा संगीतमय कार्यक्रम सादर करून गांधी चौकात प्रचंड गर्दीत मनुवादी व्यवस्थेवर हल्ला चढविला. या कार्यक्रमाचे मुख्य आयोजकआमदार प्रतिभा धानोरकर आणि आमदार सुधाकर अडवाले हे प्रामुख्याने उपस्थित राहून संगीतमय कार्यक्रमाचा आनंद घेतला. तथा आमदार धानोरकर या अनेक गाण्यांना दाद दिली .काही स्मृतींना उजाळा देत त्यांना अश्रू अनावर झाले. अनिरुद्ध वनकर यांनी कबीरा, माझी आजी म्हणायची, शिवरायांच्या छायेखाली, बहुजन जागेगा तो चोर लुटेरा भागेगा, एक वाढलेली काडी ,अशा अनेक गीतांसह तथा सुप्रसिद्ध गायिका व अभिनेत्री कोमल धांडे यांनी बुद्धही बुद्ध आहे .चांदण्याची छाया, आणि माणसाने माणसाशी आणि शेवटी अनिरुद्ध वनकर यांचे वादळवार या गीताने कार्यक्रमाची सांगता झाली. गोपाल अमृतकर,भारत रंगारी, नरेंद्र डोंगरे तावडे व इतर संस्थाने परिश्रम घेऊन गांधी चौकात कार्यक्रम यशस्वी झाला.

# ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नातून नगर परिषदांना २५ कोटींचा निधी मंजूर

## मूल,बल्लारपूर आणि पोंभुर्णासाठी वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत विशेष अनुदान

**चंद्रपूर । प्रतिनिधी**


जिल्ह्यातील ग्रामीण आणि शहरी भागात नागरिकांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार सदैव प्रयत्नशील आहेत. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे मूल, बल्लारपूर नगर परिषद आणि पोंभुर्णा नगर पंचायतीकरीता वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत विशेष अनुदानातून २५ कोटींचा निधी मंजूर झाला आहे. याबाबतचा शासन निर्णय २९ फेब्रुवारी २०२४ रोजी निर्गमित करण्यात आला.

राज्यातील नगर परिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान देण्यात येते. या अंतर्गत बल्लारपूर नगर परिषदेकरीता १२ कोटी ३४ लक्ष ९७ हजार रुपये, मूल नगर परिषदेकरीता ६ कोटी २५ लक्ष ३ हजार रुपये आणि पोंभुर्णा नगर पंचायतीकरीता ६ कोटी ४० लक्ष रुपये, असे एकूण २५ कोटी रुपये मंजूर झाले आहे.बल्लारपूर नगर परिषद अंतर्गत मंजूर झालेल्या कामांमध्ये खुल्या जागांचा विकास करणे, खुल्या जागेवर संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे, बल्लारशहा वेकोली संकूलात व्हॉलीबॉल ग्राऊंडचे बांधकाम करणे, स्प्रिंकलर आणि पाणी व्यवस्थापन करणे, सेपरेटर गॅलरीचे बांधकाम करणे, नवीन टॉयलेट ब्लॉक आणि चेंजींग रूमचे बांधकाम, विद्यमान पॅव्हेलियनचे इमारतीचे नुतनीकरण करणे आणि वेकोली संकूलात क्रीडा व पायाभूत सुविधांचा विकास करणे, तेलगू समाज स्मशानभुमीचा विकास करणे तसेच सी.सी. रोड बांधकाम करणे आदी कामांसाठी बल्लारपूर नगर परिषदेला १२ कोटी ३४ लक्ष ९७ हजार रुपये मिळणार आहे.मूल नगर परिषदेअंतर्गत मटन मार्केट येथे मैला शुध्दीकरण उभारणी, न.प. अंतर्गत विविध रस्त्यांचे बांधकाम, विविध प्रभागातील सी.सी.रोड, लादीकरण व नाली बांधकाम, खुल्या जागांचा विकास करणे यासाठी मूल नगर परिषदेला ६ कोटी २५ लक्ष ३ हजार रुपये मंजूर झाले आहे. तर पोंभुर्णा नगर पंचायतीकरीता ६ कोटी ४० लक्ष रुपये मंजूर झाले असून यात अंतर्गत रस्त्यांचे बांधकाम, नाल्यांचे बांधकाम, नगर पंचायतीकरीता डस्टबीन खरेदी करणे, शहरात वाढीव विद्युत खांब बसविणे, पाणी पुरवठा विहिरीचा गाळ काढणे व विहीर दुरुस्ती करणे तसेच पाणी पुरवठा योजनेकरीता वाढीव मोटारपंप खरेदी करणे आदी कामांचा समावेश आहे. उपरोक्त तीनही नगर परिषद / नगर पंचायतीला पायाभूत सुविधांकरीता मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल नागरिकांनी जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे आभार मानले आहेत.



# संजय गांधी निराधार अनुदान योजनाचे २१७ प्रकरणे मंजूर

## संजय गांधी निराधार योजना समिति तालुका चंद्रपूर



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या संजय गांधी निराधार अनुदान योजना समिती ग्रामीण चंद्रपूरची बैठक दि.२८ फेब्रुवारी २०२४ ला चंद्रपूर तहसील कार्यालयात तहसीलदार यांच्या दालनात संपन्न झाली.

तहसीलदार चंद्रपूर यांच्या मार्गदर्शनाखाली संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीचे अध्यक्ष विलास टेंभूरणे,शासकीय सदस्य राजू धांडे नायब तहसीलदार संगायो चंद्रपूर, संवर्ग विकास अधिकारी पं स चंद्रपूर तसेच अशासकीय सदस्य केमा रायपुरे,अतुल पिपलवार,देवराव कोंडेकर,वासुदेव गावंडे,सुभाष गौरकार,भारत गोहणे,किशोर ढवळे,शिवसाजन गोहणे,अनुताई ठेंगणे यांच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या बैठकीत एकूण २१७ प्रकरणे सर्वनूमते मंजूर करण्यात आली. यात दिव्यांग,निराधार विधवा,परित्यगता,अविवाहित , दुर्धर आजाराने ग्रस्त रुग्ण,वृद्ध आदींचा समावेश आहे.

# दिंडोरा बॅरेज प्रकल्पातील शेतकऱ्यांना तात्काळ न्याय द्यावा

## अतिरिक्त मुख्य सचिव यांच्याकडे आमदार धानोरकर यांची मागणी



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

दिंडोरा बॅरेज प्रकल्पातील मागण्यांसंदर्भात आज विधान भवनामध्ये उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समितीकक्षात अतिरिक्त मुख्य सचिव कपूर यांच्या मुख्य उपस्थितीत दिंडोरा बॅरेज प्रकल्पातील शेतकऱ्यांना न्याय देण्याच्या संदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी वरोरा तालुक्यातील दिंडोरा बॅरेज प्रकल्पामुळे बाधित गावांची तात्काळ पुनर्वसन करुन मोबदला देण्याची मागणी आमदार प्रतिभा धानोरकर यांनी केली.

१९९६ मध्ये प्रकल्पासाठी जमिन अधिग्रहीत करुन त्यावेळेस जेमतेम मोबदला शासनाकडून दिला गेला. परंतु अद्यापही सदर प्रकल्प पूर्णत्वास आला नाही. सदर प्रकल्पास गावकऱ्यांचा विरोध नसून या प्रकल्पामुळे पावसाळयात वरोरा तालुक्यातील अनेक गावांचे प्रचंड नुकसान होत आहे. यासाठी शासनाने प्रकल्पबाधीत ९ गावांचे तात्काळ पुनर्वसन करावे, अशी मागणी आमदार धानोरकर यांनी बैठकीत केली. तसेच शेती गेल्याने शेतकऱ्यांच्या पाल्याला सदर प्रकल्पात नोकरीमध्ये सामावून घ्यावे, अशी मागणी देखील यावेळी करण्यात आली. या प्रकल्पाकरीता २४० कोटी रुपयांची संभाव्य मागणी असून याद्वारे बाधित गावांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. तरी सदर सानुग्रह निधी मंजूर करुन प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्याची भूमिका शासनाने घ्यावी, अशी विनंती आमदार धानोरकर यांनी सरकारकडे केली. यासंदर्भात शासन लवकरच योग्य भूमिका घेऊन प्रकल्पग्रस्तांसाठी निधी उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन अतिरिक्त मुख्य सचिव यांनी उपस्थिताना दिले.या बैठकीकरीता आ.समीर कुणावार, आ. बोदकुलवार, आ.उइके यांच्यासोबत अतिरिक्त मुख्य सचिव कपूर, परदेसी, वरखडे , पवारयांची उपस्थिती होती. तसेच बैठकीकरीता प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे काही प्रतिनिधी उपस्थित होते.

# सेवानिवृत्तीनंतरचे जीवन कुटुंबासोबत आनंदाने घालवा: खाण प्रबंधक अनिल बोरडे

**भद्रावती । प्रतिनिधी**




आपल्या नोकरीच्या कर्तव्यावर असताना कामगार हा आपल्या कंपनीच्या उत्कर्षाबद्दल सतत विचार करीत असतो. यादरम्यान कामाच्या व्यापामुळे आपल्या कुटुंबाकडे काहीसे दुर्लक्ष होत असते. मात्र आता आपण सेवानुत्र निवृत्त झाला आहात, त्यामुळे सर्व चिंता सोडून आपला पुढील काळ कुटुंबांसोबत आनंदाने घालवा व चिंतामुक्त जीवन जगा असे आवाहन खान प्रबंधक अनिल बोरडे यांनी सेवानिवृत्त कामगारांना केले. वेकोली घुगुस क्षेत्राच्या बेलोरा नायगाव खाणीत सेवानिवृत्त झालेल्या कामगारांच्या निरोप तथा सत्कार संबंधाचे आयोजन करण्यात आले. त्यात ते बोलत होते. यावेळी बेलोरा नायगाव खाणीचे खान प्रबंधक अनिल बोरडे, सेलवन ...छ, पाचपोर,कामगार नेते दीपक जयस्वाल,श्रीकांत माहुलकर,मनोज बिट्टूरवार, राजकुमार निशाद, अरुण मेश्राम, प्रमोद वंजारी ,मनोज चिकाटे, सुमन सिन्हा आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी खाणीतून सेवानिवृत्त झालेल्या सुंदरसिंग पवार, प्रमोद शेंडे व दिलीप भोसकर या तीन कामगारांना खान प्रबंधक अनिल बोरडे प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित अधिकारी तथा कामगार नेत्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाचे संचालन प्रफुल इखारे यांनी तर आभार नारायण जांभुळकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुनील बिपटे, संकेत खोकले प्रज्ञावंत लोणारे, प्रशांत डोहे, राजू खोके आदींनी सहकार्य केले.

# वामनराव बिपटे यांचे निधन

**भद्रावती । प्रतिनिधी**



येथील सुरक्षा नगर रहिवासी तथा आयुध निर्माणी येथील सेवानिवृत् भांडारपाल वामन विठ्ठलराव बिपटे वय ७३ वर्ष यांचे दिनांक २९. २. २०२४ रोज गुरुवारला राहते घरी आकस्मिक निधन झाले. मृतकाच्या पार्थिव्यवावर आज दिनांक १ मार्चला दुपारी एक वाजता मोक्षधाम स्मशानभूमीवर अंत्यसंस्कार पार पडले. यावेळी सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी श्रीराम गोहने यांच्या अध्यक्षतेत शोकसभा पार पडली .मृतकाच्या पश्चात एक मुलगा, सून, नातू- नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे .



नागभीड तालुक्यातील मिंडाळा मींथुर रस्त्यावरील हे झाड जरी काटेरी असले तरी फुले मात्र मनमोहक आहेत. त्यामुळे 'मस्तीत राहू,..... मंजुळ गीत गाऊ प्रीत सजना...'हे गीत मुखात येऊन मन:शांती मिळाल्याशिवाय राहत नाही. छाया :प्रणय बांगरे.

# ऑटो संघटनेच्या वतीने विवेक बोढे यांचा सत्कार



**घुग्घुस । प्रतिनिधी**

येथील ऑटो संघटनेच्या वतीने नवनियुक्त भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे यांचा सत्कार करण्यात आला.नुकतीच भाजपा जिल्हा महामंत्री पदावर विवेक बोढे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने ऑटो संघटनेचे पदाधिकारी, चालक व मालकांनी भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे यांची ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्रात भेट घेतली व शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.यावेळी ऑटो संघटनेचे अध्यक्ष सिनू सुद्दाला, संतोष कोंडपेल्लीवार, रामू बहुराशी, दीपक खुटेमाटे, किशोर कोंडावार, ज्योतीसिंग चौव्हान, बाबा बंड आदी उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .